
# डॉ. नितीन मोरे



# तिसऱ्या घाताची गंमत!

## (५ बाल नाटिका)

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# तिसऱ्या घाताची गंमत!

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

**हे नाटक पूर्णपणे काल्पनिक आहे. याचे कोणा वास्तवाशी साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. करमणूक एवढाच याचा उद्देश आहे.**

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १४ नोव्हेंबर २०२३ (बालदिन)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या पुस्तकातील कविता मे-जून २०२३ मधे लिहिलेल्या आहेत. त्यांचा आणि नंतर महाराष्ट्रात घडलेल्या घडामोडींचा काहीही संबंध नाही.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# तिसऱ्या घाताची गंमत!

(५ बाल नाटिका)

डॉ.नितीन मोरे



# तिसऱ्या घाताची गंमत!

## अनुक्रमणिका

१. तिसऱ्या घाताची गंमत!
२. एक मॉन्स्टर अक्राळविक्राळ!
३. श्याम ओकच्या डोक्यावर खोक!
४. आगाऊ!
५. पाणी..पाणी!



# तिसऱ्या घाताची गंमत!



स्थळ : राजे चक्रमादित्य यांचा दरबार

महाराज सिंहासनावर बसलेले आहेत. हातात फूल घेऊन. शिपाई आत येतो. मुजरा करतो..

शिपाई: महाराज..घात झाला!

महाराज: काय झाले? तू जा.. प्रधानजी सांगाल काय कसला घात झालाय तो?

प्रधानजी: घात.. घात..झाला.. महा.. घात.. महा..राज..महाराज घात..घात झाला

महाराज: काय झाले सांगा..

प्रधानजी: घात..घात झाला.. महाराज.. घात!

महाराज: अरे काय झालेय..आभाळ पडल्यासारखे ओरडताय..आभाळ पडले की काय?

प्रधानजी: नाही महाराज

महाराज: आमच्या मुदपाकातील आचारी आजारी पडलाय का?

प्रधानजी: नाही महाराज!

महाराज: आमच्या लाडक्या शन्नू कुत्र्याच्या शेपटीचे गळू फुटले काय?

प्रधानजी: नाही महाराज!

महाराज: मग आमच्या राणीसाहेबांस काही कमी पडलंय?

प्रधानजी: नाही महाराज..! घात..

महाराज: मग कुणी सैन्यबिन्य घेऊन हल्ला करायला आलं की काय?

प्रधानजी: नाही..! घात..आठ..

महाराज: अरे आठ घात? काय? आठवेळा घात की काय?

प्रधानजी: नाही..तिसरा घात..!

महाराज: तिसऱ्या? ऐकून पाणी सुटलंय तोंडाला.. तिसऱ्या मसाला.. भूक लागली आम्हास.. अशावेळी असली खाण्याची गोष्ट बोलत जाऊ नका प्रधानजी.. अजून दरबाराच्या मधल्या सुट्टीस वेळ आहे.. आज काय दिले असेल डब्यात राणीसरकारांनी?

प्रधानजी: क्षमा असावी पण तिसऱ्या नव्हे महाराज.. तिसरा..

महाराज: पण घात काय? कुणी खाऊन टाकलाय का तिसऱ्या मसाला? ही जुर्रत? कोण आहे रे इकडे?

प्रधानजी: महाराज.. माफी.. पण इकडे तर तुम्हीच आहात.. आणि.. तिसरा..

महाराज: बस्स! कोण आहे रे तिकडे?

प्रधानजी: महाराज...त्या तिसऱ्याचे काही नाही झाले.. एक कालवण सोडून..

महाराज: मग दुसऱ्याचे झाले असेल..पण अजून तिकडून कोणी शिपाई नाही आला तो? कोण आहे रे तिकडे?

प्रधानजी: क्षमा महाराज..त्याने सुट्टी घेतलीय.. कॅज्युअल! आणि घात..

महाराज: समजलो.. आम्ही समजलो.. घात झालाय.. घात

प्रधानजी: तिसरा महाराज..घात

महाराज: तिसऱ्यांदा घात..?

प्रधानजी: नाही महाराज.. दोनाचा तिसरा.. घात

महाराज: कोणी केलाय? दोनाचा तिसरा?

प्रधानजी: आपले गणिताचे मास्तर.. संखे गुरूजी..

महाराज: संखे...अगदी योग्य नाव गणितासाठी..

प्रधानजी: होय महाराज...

महाराज: तर त्यांनी घात केलाय तर..

प्रधानजी: होय महाराज..

महाराज: कोण आहे रे.. इकडे.. इकडे मीच.. तिकडे.. सुट्टीवर.. कोण आहे रे पलिकडे?

प्रधानजी: क्षमा असावी महाराज.. पण तिकडची सिक्युरिटीची पोस्ट खाली आहे..भरली नाही अजून.. आधीच्यानी राजीनामा दिलाय..

महाराज: हं..कोण आहे रे अलिकडे?

(एक शिपाई आत येतो)

शिपाई: हुकूम महाराज..

महाराज: तू नाही गेलास कुठे सोडून?

शिपाई: नाही महाराज.. आणि कुठे जाणार महाराज?

महाराज: जा..मास्तरांना घेऊन ये..

शिपाई: हुकूम महाराज..पण कोणते मास्तर? शाळेतले की बसमधले? तिकीट वाटणारे?

महाराज: गणितवाले.. शाळेतले

शिपाई: जी महाराज..

( शिपाई जातो आणि लगेच परत येतो..)

महाराज: शिपाई.. का परत आलास?

शिपाई: कोणाकोणाला आणू महाराज? संख्ये म्हणजे.. कोटी.. सहस्त्रबुद्धे.. हजारे..की साठे मास्तर?

महाराज: नाही..

शिपाई: मग द्वादशीवार.. दशपुत्रे.. नवघरे.. अष्टपुत्रे..?

महाराज: खामोश..

शिपाई: क्षमा महाराज.. एकबोटे.. द्विवेदी.. त्रिवेदी.. चौबे.. चतुर्वेदी.. की सातघरे की सातपुते महाराज?

महाराज: किती बोलतोस रे तू शेंदाड शिपाया? यापैकी कोणी नाही.. नन ऑफ द अबोव्ह..

शिपाई: महाराजांनी नाव सांगितल्यास बरे होईल..नाहीतर झाडून साऱ्या संख्यांना बोलवावे लागेल..

महाराज: कोणाला काय? मास्तरांचे नावच संखे.. जा एकनाथ संखे मास्तरांना.. घेऊन ये.. जलदी.. त्वरित..

शिपाई: होय महाराज..जो हुकूम महाराज

(शिपाई जातो.. संखे गुरूजींना घेऊन येतो. संखे गुरूजी महाराजांना मुजरा करतात. खाली वाकून मुजरा करताना टोपी खाली पडते आणि शेंडी लटकू लागते. हळूच ती टोपीत लपवत गुरुजी टोपी डोक्यावर घालतात. महाराज रागावलेल्या आवाजात बोलू लागतात.)

महाराज: मास्तर...कशाला घात करताय? तेही तिसऱ्यांदा?

( गुरूजी काही न कळून उभे राहतात.. )

महाराज: तीनवेळा घात..मास्तर..का?

( गुरुजी तसेच उभे..)

महाराज: बोला मास्तर..बोला..तुम्हाला बोलावेच लागेल

गुरुजी: क्षमा असावी महाराज..पण काहीतरी गैरसमज होतोय..

महाराज: घात केलात आणि गैरसमज? आमच्या राज्यात हे आम्ही खपवून नाही घेणार..पण तुम्ही काय घात केलात.. तुमच्याच तोंडून ऐकू देत.. तिसरा घात..

गुरुजी: क्षमा महाराज.. मी मुलांना शिकवत होतो.

महाराज: घात करायला?

गुरुजी: होय महाराज..

महाराज: आमच्या राज्यात आमचाच घात?

गुरुजी: नाही महाराज.. तुमचा नाही दोनाचा तिसरा घात..

महाराज: पुन्हा घात.. तरी आमच्या या हेरांनी नीट पाळत ठेवली म्हणून कळले.. सांगा का आणि कसा करायचा तुम्हाला घात..?

गुरुजी: महाराज.. क्षमा असावी.. ते एक सूत्र आहे.. दोनाचा तिसरा घात.. घन काढण्यासाठी

महाराज: धन.. मास्तर धनासाठी घात.. तुम्ही.. तो ही मुलांकडून?

गुरुजी: धन नाही महाराज.. घन महाराज.. दोन गुणिले दोन गुणिले दोन..म्हणजे दोनाचा तिसरा घात.. म्हणजे दोन सेंटिमीटर बाजू असलेल्या घनाचे आकारमान काढण्यासाठी हे सूत्र वापरतात.. यास म्हणतात दोनाचा तिसरा घात..(सर्व दरबाऱ्यांकडे हात फिरवत) समजलें रें सर्वांस.. तुम्हाला प्रधानजी? आणि बरंका मुलांनो.. हेच सूत्र बाकी ठिकाणी पण वापरता येईल..

महाराज: म्हणजे हा घात गणितातला आहे?

गुरुजी: होय महाराज!

महाराज: म्हणजे हा घात म्हणजे तो घात नाहीच?

गुरुजी: नाही महाराज..

महाराज: बरे झाले सांगितले मास्तर. नाहीतर आम्ही तुमच्यावर या घातापायी आघात केला असता.. शिपाई..


शिपाई: जी महाराज

महाराज: संखे गुरूजींना सोडून या..आणि लक्षात ठेवा.. गणितातला घात हा तो घात...

दरबारी: नाही...!

गुरुजी: काय समजलें ना सर्वांना?

सगळे(महाराजांसकट) : होय गुरुजी!





# एक मॉन्स्टर अक्राळ विक्राळ !



एक बाग. त्यात खेळणारी २ मुले ३ मुली. काही खेळताहेत, काही बसून गप्पा मारताहेत.

तेवढ्यात टांगा टाकत एक राक्षस येतो. (राक्षस राक्षसा सारखा असला तरी थोडा जोकरसारखा दिसतोय.)

राक्षस ( जोरजोरात हसतो) : ही हा हा हा ही हाहाहा ही..

सगळी मुले दचकतात नि खेळ सोडून त्याच्याभोवती जमा होतात. थोडे भ्यालेले थोडे चकितसे भाव.

राक्षस : ही हा हा हा ही हा हा हा ही..

मुलगी १ : अगं हा काका बघ चुकीचा बोलतोय. हे असं नाय काय बोलत.. ह हा हि ही हु हू हे है हो हौ.. असं बोलतात

राक्षस : ही हा हा हा ही हा हा ही..

मुलगी २: अगं, हा काका काय 'ह' ची बाराखडी नाय बोलतोय. आपल्याला घाबरवतोय तो, हो की नाय काका?

मुलगा २ : बाय द वे हू आर यू?

मुलगा १ : कोन हायेत तुम्ही? काका?

राक्षस : काका? नाही नाही. मी आहे एक.. राक्षस..

मुलगी २ : ओह. हात्तिच्या.. कूल..

मुलगी ३ : कूल..जस्ट अ राक्षस..

मुलगी १ : कूल काय? अगं, जस्ट राक्षस नाय, राक्षस म्हणजे मॉन्स्टर..

मुलगी २ : बापरे! मॉन्स्टर अंकल.. नाय नुस्ता मॉन्स्टर..

मुलगी ३ : बचाव..बचाव.

मुलगा १ : बचाव बचाव काय. काय नाय करत हे काका, (हात लावून दाखवत) बघ.

मुलगा २ : माहितीय? दुनिया तबाह करनेवाला हाच तो मॉन्स्टर!

राक्षस : ही हा हा हा ही हाहा हा ही

मुलगा २ : दुनिया तबाह.. मॉन्स्टर काका, मॉन्स्टर काका..
राक्षस : चुप्प, मी नाय काय काका बिका..
मुलगी १ : मग मामा?
राक्षस : चुप्प
मुलगी ३ : मग दादा?
राक्षस : चुप, मला बघून मुलं घाबरतात.. चळाचळा कापतात..
मुलगा १ : काय कापतात?
मुलगी २ : अरे भेंडी कापतात ना!
मुलगी १ : भेंडी कापत नाय काय, चिरतात!
मुलगी ३ : नाय म्हण्जे कागद कापतात ना!
मुलगा १ : अगं कागद फाडतात.. कापत नाय काय..
मुलगी २ : मग काय कापतात?
मुलगी १ : गवत कापतात..
मुलगी २ आणि ३ : अय्या हे गवत कापतात काका?
सारी मुलं नाचत नाचत : हे हे! गवत कापणारा राक्षस ! गवत कापणारा राक्षस!
राक्षस : खामोश ! मी अक्राळ विक्राळ..
मुलगी २ : अक्राल विक्रा.. छी! किती कठीण नाव. तुला तुझी आई कशी हाक मारते रे काका?
मुलगा १ : अगं, अक्की नाय तर विक्की म्हणत असणार नक्की, हो की नाय काका?
राक्षस : चुप्प. मला पाहून मुलं चळाचळा कापतात.. मी अक्राळ विक्राळ.. ही हा हा हा ही हाहा..
मुलगा १ आणि २ : हो? ( टोन बदलत) हो.. अक्की अंकल

राक्षस : कापतात म्हणजे घाबरतात..

मुलगी १ : अगं, आता मला कळलं . मगापासून हे अक्की विक्की मॉन्स्टू अंकल आपल्याला घाबरवतायत

मुलगा २ : हो ना, आणि आपल्याला कळलं सुद्धा नाही ना?

मुलगी २ : हो ना, मॉन्स्टर अंकल आता आम्ही स्केअर्ड मंजे घाबरलोय.. जा आता तुम्ही.

मुलगा २ : जा काय? मॉन्स्टरला किती कामं असतात माहिताय?

मुलगी ३ : काय?

मुलगा २ : दुनिया तबाह करायची म्हणजे काय मॅगी खायचं काम नाय!

मुलगा १ (जाहिराती सारख्या सुरात) : बस्स दो मिनिट मे तय्यार.. टिंग टॉंग!

मुलगी २ : से मॉन्सू.. व्हाय डू यू वॉंट्टू डू दिस दुनिया तबाह?

मुलगी १ : अगं, काका काय इंग्लिश नाय बोलतात.. शुद्ध देसी राक्षस आहेत हो की नाही हो काका?

राक्षस ( पुढे येता येता) : च्या मारी ! पोरं हायत की काय.. कोणी घाबरत नाय.. राक्षस राव काय खरं नाय..

पुढे येता येता अडखळतो

मुलगा १ : ए भाय जरा देखके चलो..

मुलगी ३ : अगं हा असा राक्षस आला ना की कोणी ना कोणी मॅन येतोच पाठी..

मुलगा २ : मी पण टीव्ही वर पायलय..

मुलगा १ : मॅन म्हण्जे?

मुलगी ३ : अरे तो नाय का चड्डी घातलेला..पर मॅन

मुलगी १ : पर मॅन नाय काय..सू सू..

मुलगी २ : जा जा. लवकर राक्षस टीचर, राक्षस टीचर हिला सू सू आलीय..

मुलगी १ : सू सू नाय गं, परमॅन नाय सुपर मॅन.

मुलगी ३ : मला पण म्हायतेत , अजून हायेत

मुलगा १ : शक्तिमान..

मुलगी २ : स्पायडरमॅन

मुलगा २ : बॅटमॅन

मुलगी १ : बॉलमॅन

मुलगी ३ : पोकेमॅन

मुलगी २ (एका मुला कडे बोट दाखवत): आणि हा अंशुमॅन

मुलगा २ : छे! तो नाय काय मॅन.. सगळ्यात ताकतवर कोण माहिताय? हनुमॅन

मुलगा १ : जय बजरंग बली, तोड दे इस राक्षस की नली..

मुलगी २ : पण हे मॅन लोक खरे नसतात काय.. माझ्या मम्मीनी सांगलंय माला.

मुलगा २ : माझ्या पण बाबानी सांगितलंय माला

मुलगा १ : म्हण्जे काय हा मॉन्स्टर खराय..?

मुलगी १ : मॉन्स्टर काका, मॉन्स्टर काका तुमी खरे की खोटे?

मुलगा २ : चिमटा घेऊन पाहूया..

राक्षस : चिमटा? मला? ही हा हा हा ही हाहा हा

मुलगा १ : मला वाटतंय या काकाकडे एकच टेप हाय हसण्याची.. ही हा हा ही हा हा हा..

मुलगी १ : पण मी पाहिलंय टीव्हीवर.. राक्षसाला दहा मुंडकी असतात

मुलगी २ : दहा? म्हंजे?

मुलगा१ : टेन.. टेन मुंडीचा असतो राक्षस. म्हण्जे हा राक्षस नाय काय..

राक्षस : ही हाहाहा ही हा हा हा ही

मुलगी ३ : बस रे काका, तुजी बाकी मुंडकी कुठायत?

मुलगी २ : बाकी म्हण्जे?

मुलगी १ ( टीचरच्या आवेशात ) : दहा हवीत, आहे एकच.. अजून किती हवीत?

मुलगी ३ : टेन मायनस वन.. टीचर

मुलगी २ : परफेक्ट. म्हण्जे नाईन टीचर

मुलगी १ : परफेक्ट

मुलगा १ : मॉन्सूकाका, मॉन्सूकाका.. तुमी कदी शाळेत गेले?

राक्षस : शाळेत? ही हा हा हा ही हाहा!

मुलगा २ (नाचत) : हे, हे, मॉन्स्टरची शाळा, मॉन्स्टरची शाळा..

राक्षस : खामोश ! मी मॉन्स्टर आहे.. राक्षस आहे.. मला भीता की नाही..

मुलगा २ : नाय काका. पयली नऊ मुंडकी दाखव..मग विचार करू

राक्षस : कसला विचार?

मुलगा २ : म्हण्जे घाबरायचं की नाय याचा

राक्षस : ती मुंडकी बाहेर गेलीत.. दुसरीकडे

मुलगी १ : बाकी मुलांना घाबरवायला?

सगळी मुलं नाचायला लागतात : हे, हे, एक मुंडीचा राक्षस, एक मुंडीचा राक्षस..

राक्षस : पोरांनो तुम्ही चुप बसा..नायतर..
मुलगा १ : नायतर काय?
मुलगी १ : सांग ना मॉन्स्टरकाका. सांग ना..नायतर गोष्ट सांग ना मस्त
मुलगा २ : पण तुझ्यासारखी हां
राक्षस : माझ्यासारखी? भीतीदायक? ही हा हाहा हा ही हा हा
मुलगा २ : छे भीती नाय काय, कॉमेडी सांग तुझ्यासारखी!
मुलगा १ : हे, हे, काकाची कॉमेडी गोष्ट ऐका..
मुलगा १ : तुला म्हायतेय.. काकाने काकूला कसली कसली कामं करायला काढून कॉमेडी करून..
राक्षस : चुप्प. मी मुलांना खाणारा राक्षस आहे.
ही हा हा हा ही हाहा.. आता मी ब्रेकफास्ट करायला सुरूवात करणार आहे.. तोंडाला पाणी सुटलंय..(मुलांकडे पाहात) हिला खाऊ की ह्याला की ह्याला?
मुलगी २ : तू दहाही तोंडांनी एकावेळीच खातो का?
मुलगी ३ : काका तुला दहा तोंडं असताना सगळ्या तोंडांना पाणी सुटतं का?
मुलगी १ : अय्या! म्हणजे पूर येईल नदीला..
मुलगी २ : व्हॉट इज नदी?
मुलगा २ : अगं नदी म्हण्जे रिव्हर..
राक्षस : चुप्प. मी आता एकेकाला खाईन ना तेव्हा सगळे घाबरतील. कोणाला खाऊ पहिले?
मुलगी २ ( ३ कडे पाहात): हिला खा. ही ना माजा डबा खाते म्हणून

मुलगी ३ : ए नाय रे. तू मला खाल्लंस ना तर मी तुला पोटात गेल्यावर गुदगुदल्या करेन.

मुलगी १ (मुलाकडे पाहात): नायतर याला खा. किती गुबगुबीत आहे बटाट्यासारखा

मुलगा १ : ए मी बटाटा तर तू ..कांदा.. नाय तर मी बटाटा तर तू रताळं.

मुलगी २ : रटाळं? म्हण्जे?

मुलगा १ : स्वीट पोटॅटो..

मुलगी २: मी हैना.. याच्या पोटात गेलीना की हैना याला आतून बाईट करणारे..( तोंड उघडून चावण्याची ऍक्शन) आश्शी!

मुलगी १ : आणि मी गुदगुदल्या!

मुलगी ३ : मी फर्स्ट..

मुलगी १ : नाय मी फर्स्ट..

मुलगी २ : ए, किती ऑयली हाये तुझे केस.किती तेल पहा.. माला हैना मम्मीने सांगलंय.. तेलकट खाल्लंना की खोकला होतो. मी पैली जाणार याच्या पोटात. हो की नाय अंकल?

राक्षस : चुप्प. गप्प. खामोश !

मुलगा १ : आणि ना टीचर बोलते अशा वेळी. शांत बसा मुलांनो..

राक्षस : आता मी एकेकाला खाणारे.. उचलतोच आता एकेकाला..

मुलगा १ : पण पोटात किती उकडेल ना?

मुलगा २ : नाय काय उकडत. पोटात फॅन असतो माहिताय? भूक लागली की कसा पोटातून आवाज येतो ना तो फ्यानाचा असतो.

मुलगी १ : अय्या.. या मॉन्स्टरचे दात तर पहा.. छी.. किडलेत.. काका तू दात नीट नाय घासतोस?

मुलगी २ : मी टू वेळा घासते.
मुलगा १ : मी पण.
मुलगी ३ : मला सगळे गुड गर्ल बोलतात.
मुलगा १ : मी पण.
मुलगी २ : तू पण गुड हायेस काय रे?
मुलगा २ : ए मी पण दोन्दा घासतो. डेटॉल ने
मुलगी १ : डेटॉलने दात नाय घासत काय.. हात धुतात..पण राक्षस काका तुजे दात दुखतात का?
राक्षस : चुप. मी चावणार नाही. गिळणार आहे एकेकाला..
मुलगी १ : अय्या तू अजगर आहेस? आम्हाला बाईंनी सांगितलंय.. अजगर गिळतो डायरेक म्हणून..
मुलगी २ : म्हण्जे तू मॉन्स्टर नाय.. अजगर हायेस? अजगर मॉन्स्टर काका!
राक्षस : चुप्प.. अगदी आवाज नको..मला.. कुठून इथे आलो आज.. कोणी मला घाबरत नाही.. (रडायला लागतो)
मुलगी २ : अय्या..काका रडतायत बघ
मुलगी १ : अरे उगी उगी..मी रडली की आई अशीच बोलते
मुलगी ३ : माला वाटते काकाला भूक लागली
मुलगी २ : काका, तू माजा टिफीन खा हां.. मस्त लेज नि पॉपकॉर्न.. रडू नको.. भूक लागली की माला पण रडू येतं
मुलगी १ : काका, तू रडू नको हां, (घाबरण्याची ऍक्शन करत) तुला बरं वाटायला हवं ना..तर ही पा मी घाबरली.. आता ठीक आहे? आता हास पाहू..
मुलगा १ आणि २ : ही हा हा हा ही हाहा..

मुलगी १ : शाणा माजा मॉन्स्टर..

राक्षस (डोळे पुसत) : काय रे पोरांनो.. मी आलो तुम्हाला घाबरवायला.. पण तुमच्या पुढे माझा दुष्टपणा खतम..आता मी तुमचा दोस्त.

मुलगी १ : काका आमचा दोस्त, काका आमचा दोस्त..

मुलगा १ : ए म्हण्जे म्हणजे तू आता दुनिया तबाह नाय करणार?

मुलगा १ : आणि मग हनुमान पण नाय येणार?

मुलगी २ : मला पायजे हनुमॅन..तू कर ना दुनिया तबाह..

मुलगा १ : मग हनुमान येईल

मुलगा २ : मग जाम फाइटिंग..

मुलगा १ : मज्जा मज्जा.. सॉलिड..

मुलगी १ : मी हैना हनुमानाची शेपटी पकडणारे

मुलगी ३ : मी पण!

मुलगा १ : माला हनुमानाची गदा हवी.

मुलगा २ : माला पण..

राक्षस (प्रेमाने) : चुप्प मुलांनो..किती गोंधळ..

मुलगा २ : ए काका, तू दुष्टच चांगला वाटतोस.. नायतर हनुमान कसा येईल?

मुलगा १ : होतो की नाय दुष्ट काका.. आता हास.. ही हा हा हा ही हाहा

राक्षस (जोरात हसतो) : ही हाहा हा ही हा हा हा

मुलगी १ : आता कसा राक्षस शोभतोस रे.. हनुमान आजा

मुलगी २आणि ३ : हनुमॅन आजा.न

मुलगा १ : आजा हनुमान नहीं तो ये दुनिया तबाह कर देगा.. हनुमान आजा

सगळी मुलं : हनुमान.. हनुमान.. हनुमान

हनुमान येतो..राक्षस वाकून लपल्यासारखा बसतो

सगळे : हनुमान.. हनुमान.. हनुमान.. हनुमान
हनुमान : काय रे पोरांनो.. कशाला बोलावलंत मला?
मुलगा १ आणि २ : हनुमान, हनुमान हा अक्राळ विक्राळ पा.. आलाय दुनिया तबाह करायला. तूच वाचव आता
हनुमान : कुठाय तो?
मुलगा १ : हा बघ..
मुलगा २ : ए मस्त फायटिंग कर हां..
मुलगी २ : ढिशूम ढिशूम..
मुलगी १ : गदा घेऊन..

हनुमान राक्षसाकडे चालत जायला लागतो.. राक्षस पळत सुटतो.. बचाव बचाव म्हणत..

मुलगा २ : छे.. पळाला.. काय फायटिंग बियटिंग नाय.. पण थ्यांक्यू हा हनुमान..
मुलगी २ : थ्यांक्यू हनुमॅन
बाकी : हनुमान थ्यांक्यू..
मुलगा १ : मॉन्स्टरकाका..परत या..कित्ती मजा..

हनुमान नि सारी मुले नाचायला लागतात..

हनुमान आला
राक्षस पळाला
ढुंगणाला पाय लावून
मॉन्स्टर पळाला
हो हो हो हो..
ही हा हा हा ही हाहा..
मुलगा १ : हनुमान, हनुमान, मी तुझ्या शेपटीशी खेळू?
मुलगी १ : मी पण
सगळे : मी पण
मुलगा २ : नायतर आपण सगळे घोडा घोडा खेळूयात?
मुलगी १ : शेपूट पकडून?
मुलगी ३ : पण माला ती गदा पायजे
मुलगी २ : माला पण हवी ती गडा
मुलगी १ : गडा नाय काय गदा? होय की नाय?
मुलगा २ : हो, गदाच आणि मी आहे शक्तिमान, मीच उचलणार ती गदा
मुलगा १ : नाय हनुमान मी फर्स्ट
मुलगी १ : माला पण ताकद हाये खूप. मी फर्स्ट
मुलगी २ : मी..
हनुमान : चला आता राक्षस गेला.. मी जाऊ?

मुलगी २ जोरजोरात रडायला लागते..

हनुमान : बरं बाई , थोड्या वेळानी जाईन..

ती अजून भोकाड पसरते

हनुमान : काय झालं गं..

मुलगी १ : मी सांगू.. हनुमान, हनुमान.. तिला नि आमाला पण फायटिंग बघायची होती पण तो राक्षस तर पळून गेला.

मुलगा १ : हो ना. सॉलिड फायटिंग पायजे.

मुलगी ३ : ढिशूम ढिशुम

मुलगी २ : माला आता पायजे, पायजे मंजे पायजे फायटिंग

हनुमान : कोणाशी करू? राक्षस तर पळाला.. पाय लावून..

मुलगा १ : परत आण त्याला, तू तर बाप्पा हायेस ना

सगळे : आमाला म्हायती तू बाप्पाच आहेस.

मुलगा २ : माला म्हायती तू लंकेत उडत गेलेला ना.

मुलगी १ : आई म्हणते बाप्पालोकांना ना काय पण जमतं!

मुलगी ३ : आणि ना बाप्प्पा आपल्याकडे नेहमी पात असतो. माजी आई बोलली माला..हो की नाय हनुमान बाप्पा

मुलगी २ : ते काई नाई. तू मॉन्स्टरला बोलाव नि ढिशूम्म..

हनुमान : पण तो तर तुम्हाला काहीच करत नव्हता ना? फ्रेंड तुमचा.

मुलगा १ : पण तो बाकी दुनिया तबाह करेल ना हनुमान, मग?

हनुमान : तबाह म्हणजे?

मुलगी १ : तू ती लंका जाळवली होती ना शेपटीने, तशी तबाह करेल तो दुनिया!

हनुमान : बापरे बाप !

मुलगा २ : मंजे तुला दुनिया वाचवायची तर फायटिंग करायलाच लागेल हनुमान

मुलगी २ : बाप्पाला काइपण इम्पॉसिबल नाय हो की नाय

मुलगी १ : प्लीज हनुमान. आण ना अक्राळविक्राळला..

हनुमान : बरं पोरांनो.. आणतो. पण..

मुलगी १ : पण नाय नि बिण नाय..

मुलगी २ : वुई वॉंट राक्षस, वुई वॉंट राक्षस..

हनुमान : बरं..न ऐकून सांगू कोणाला..

हनुमान बाहेर जातो.. येताना राक्षसाला पकडून आणतो

सगळी मुले : हनुमान, मार त्याला. म्हण्जे दुनिया नाय तबाह करणार तो

मुलगी १ : ढिशुम.. ढिशुम

मुलगा २ : त्या गदेनी मार..

हनुमान त्या राक्षसाच्या डोक्यात गदा हाणतो. दोन तीनदा. टण टण आवाज येतो तशी मुलं टाळ्या पिटतात. राक्षस खाली पडतो. हनुमान अजून एकदा गदा उचलतो तसा राक्षस म्हणतो..

राक्षस : बचाव ! बचाव !

मुलगी १ : करशील मग दुनिया तबाह?

मुलगा २ : एका अटीबर सोडवतो तुला हनुमानापासून..

राक्षस : कोणतीही अट असूदे..वाचवा मला

मुलगा २ : तू आजपासून दुनिया तबाह करायची नाही..

मुलगा १ : कबूल?

राक्षस : कबूल..हनुमान मला सोड..

हनुमान : ठीक आहे, ही मुलं म्हणतायत तर सोडतो.. परत मुलांना घाबरावयचं

राक्षस : नाही

हनुमान : मुलांना खायची गोष्ट करायची..

राक्षस : नाही

हनुमान : दुनिया तबाह करायची गोष्ट करायची..

राक्षस : नाही..

हनुमान : मग मी तुला सोडवायचं..

राक्षस : नाही.. नाय नाय... हो

हनुमान : अरे पहा किती गोड पोरं आहेत..उगाच त्यांना कशाला रे त्रास देतोस?

राक्षस : नाही अशी गोड मुलं असलेली दुनिया मी नाय तबाह करणार..

हनुमान : बघ, नाहीतर ही गदा बघ!

राक्षस : नाही, नाही, आजपासून मी आणि तू , हनुमान दोस्त आणि ही पोरं पण दोस्त!

हनुमान : पाहा पोरांनो, आता हा अक्राळविक्राळ आपला दोस्त.. नो फायटिंग नो मारामारी!

मुलगी १ : आणि दुनिया पण तबाह होण्यापासून वाचवली ना..

हनुमान : अरे तुमच्यासारखी गोड मुलं असतील तर कोण कशी ही दुनिया तबाह करेल?

राक्षस : हो ना.. हनुमान. चला आपण सगळेच नाच करू..

सगळे हातात हात घालून नाच करतात..

इतक्या सुंदर दुनियेमध्ये
इतकी सुंदर मुले
बागे मध्ये फुलली किती किती
रंगीबेरंगी फुले
चला नाचूया चला गाऊया

आपण देवाघरची फुले..
आपण देवाघरची फुले..



# श्याम ओकच्या डोक्यावर खोक!



एका शाळेतील तिसरी चौथीचा वर्ग. मुलं बाकावर बसली आहेत. त्यात एक श्याम ओक. त्याच्या कपाळावर छोटी पट्टी आहे. सर वर्गावर येतात.

मुलं:

सुप्रभात सर
सूर्य वर आल्यावर
सर आले वर्गावर

सर:

बसा मुलांनो बसा
आज भरपूर हसा..

मुलं:

तुम्ही म्हणता हसा
नि लगेच म्हणाल.. अभ्यासाला बसा!

आज आपला खेळण्याचा तास
आज नाही अभ्यास..

सर:

कारे मुलांनो? अभ्यास नाही?
शाळा ना ही? क्रीडांगण नाही..

मुलं:

पण सर झालाय प्रा◌ॅब्लेम मोठ्ठा..

सर:

प्रा◌ॅब्लेम? आणि मोठा?
का? मुरगळलाय कोणाचा घोटा?

मुलगा १:

याच्या आहे डोक्याला खोक

मुलगा २:

आणि पहा पाठीला पोक

सर:

नको पोरांनो उगा नोकझोक

श्याम:

सर, नाहीय नुसताच जोक

सर:

कोण रे तो?

उगाच बोलतोय जो?

मुलगा ३;

सर हा तर श्याम ओक..

सर:

काय रे ओक..

कशी पडली डोक्याला खोक?

पाठीला तर नाही तुझ्या पोक..

मुलगा ४:

सर तो होता नुसताच जोक..

सर:

जोक?

वात्रट पोरं..

तुमच्यावर कोण लावणार रोक?

मुलगा १:

सर, असंच म्हणतात लोक..

मुलगा २:

पण हा काढत होता पेन्सिलीस टोक

मुलगा ३:

कारण घासून घासून पडलं कागदास भोक

मुलगा ४:

मी म्हटलं, अरे श्याम ओक
सरांनी सांगितलंय.. कविता घोक

मुलगा १:

नाही केलंस तर पडेल चिंचेचा फोक

मुलगा २:

पण हा कसला ऐकतोय ओक
खेळण्याचा याला असला शोक

मुलगा ३:

खेळत होता हा पद चेंडू

मुलगा ४:

लागला डोक्यावर याच्या विटी दांडू

सर:

खेळत होता पद चेंडू
तो खेळताना लागला दांडू?
समजता मला काय अगदीच पांडू?

मुलगा १:

नाही सर, ग्राउंड आहे अगदी छोटे

मुलगा २:

खेळतात सगळे तिथे छोटे मोठे

मुलगा ३:

कुणी फुटबाॅल कुणी विटीदांडू
कुणी उगाच खेळती सागरगोटे..

मुलगा ४:

हा मारत होता चेंडूस लाथ
धावत होता हलवीत हात

मुलगा १:

सर याची ही असलीच बात
खेळतो हा ओक्या गाणी गात

मुलगा २:

तिकडून आला कुणी विटीदांडू खेळत
हातात दांडू घेऊन आला की धावत

मुलगा ३:

दोघांची झाली झटक्यात टक्कर
श्याम्याला वाटतं आली चक्कर

मुलगा ४:

पुढे होता हा श्याम्या ओक
गेला ना त्याचा इतक्यात झोक

मुलगा १:

आपटलं त्याचं दांडू वर डोक..

मुलगा २:

हॅ हॅ.. डोक नाही डोकं
काही ही बोलतो.. डोकंय की खोकं?

मुलगा १:

आपटलं त्याचं दांडूवर डोकं
पडली ना मग कपाळावर खोकं ..

मुलगा २:

हॅ हॅ.. खोकं नाही खोक
काही ही बोलतो.. न डोक ना खोक!

सर:

बस रे पोरांनो.. पुरी झाली नोकझोक

चला सुरू करू आता अभ्यास

सारी मुलं:

नको ना सर.. आज खेळण्याचा तास

रोज रोज काय अभ्यास?
आता करूया ना बास?

श्याम:

खरंय सर.. खूपच होतय त्रास

सर:

काय रे ओक? डोकं का दुखतयं
की अभ्यासाच्या नावाने डोळ्यात खुपतय?

श्याम:

नाही सर.. डोक्याला लागला ना असला मार
दुखतंय ना सारं.. इतकं फार
कपाळाला ना लागलाय ठणका
त्या दांडवाचा ना बसलाय दणका

सर: अस्सं..

दुखावला दिसतोय पाठीचा मणका..

सर:

बरंय मुलांनो..
श्यामला नाही वाटत बरं
अभ्यासाला सुट्टी देऊया खरं
सारी मुलं:
हे हे हे हे! आज अभ्यासाला सुट्टी!

मुलगा १:

बरं झालं नाही मारली आज बुट्टी!

मुलगा २:

अभ्यास एके अभ्यास

मुलगा ३:

अभ्यास दुणे अभ्यास

मुलगा ४:

अभ्यासाचा बाबा साराच त्रास

श्याम:

सर म्हणाले आता अभ्यास बास

आता नका करू त्रागा
चला खेळण्याच्या तयारीस लागा

सर:

चला रे मुलांनो.. मैदानावर जाऊ
खेळ खेळू.. मग डबे खाऊ..

मुलगा २:

आज शाळेत आहे मज्जा जाम

मुलगा ३:

अभ्यासाचे शाळेत काय असतं काम?

सर:

पण ऐका सगळ्यांनो.. ऐक रे ओक
डोक्याला तुझ्या ना पडलीय खोक?

डोकं तुझं ना दुखतंय फार
तूच म्हणालास.. बसलाय मार..

श्याम:

होय सर.. थोडा फार.. नव्हे थोडा.. जास्त फार!

सर:

मग तू बाबा बस आता वर्गातच ओक
देतो पाठांतरास कविता.. बसून घोक..

श्याम:

सर.. असं हो काय करता..
लागलंय थोडं.. पण मी काय मरता?

दुखतंय थोडं.. थोडंस फार.. नव्हे फार थोडं
अभ्यास म्हणाल तर अडेल घोडं

विचार करायला ना लागतं डोकं

नाही जमलं तर म्हणाल, ते आहे खोकं

तेच थोडं थोडं.. फारच थोडं दुखतंय
तशात खेळलं ना तर ना चालतंय..

खर्रच सर,
म्हणाला मला छोटा भीम
आणि मोठ्यांचं म्हणाल, तर म्हणाला मि.बीन

सर:

अस्सं होय लबाडा.. डोकं दुखतं थोडं
अकलेपुढे धावतं, लंगडं तुझं घोडं

का रे मुलांनो..
हा आहे ओक
आहे का याच्या पाठीला पोक?

मुलं:

नाही सर..
नाही सर

सर:

का रे मुलांनो..
हा आहे ओक
आहे का याच्या कपाळावर खोक?

मुलं:

नाही सर
नाही सर..

सर:

का रे मुलांनो
हा आहे ओक
घालू या का याच्या खेळावर रोक?

मुलं:

नाही सर
नाही सर..

सर:

का रे मुलांनो
हा आहे ओक श्याम
मस्तीखोर आहे हा जाम

मुलं:

नाही सर
नाही सर..

सर:

का रे मुलांनो
चला मैदानावर जाऊ
जाऊन खेळून खाऊ खाऊ

मुलं:

नाही सर

नाही सर..
नाही नाही.. नाही नाही
हो स्सर हो स्सर..
(सगळी मुलं गोंगाट करत धावत वर्गाबाहेर धावतात)



# आगाऊ !

ठिकाण : एका डॉक्टरची केबिन

एक बारा एक वर्षे वयाचा मुलगा आणि त्याची आई आत येतात.

डॉक्टर : ये ये शिरीष बाळा .. कसा आहेस?

शिरीष : मी ? चांगलाय आणि आणि काय, ठेविले अनंते तैसेचि रहावे..

डॉ : बाळ वय काय तुझे?

शिरीष : बारा.. पण वयात काय आहे? वय म्हणजे एक निव्वळ आकडा आहे

डॉ : वा! तर निव्वळ आकड्या .. नाही बाळा .. सांगशील का तुला काय त्रास होतोय?

शिरीष : मी? मला? गुरुजी म्हणतात.. मीपण सोडा ..

डॉ : कोण? शाळेतले?

शिरीष : नाही.. ते शालेय शिक्षक भिन्न.. हे माझी आध्यात्मिक भूक भागवणारे .. चिदानंद गुरुजी.. पपू

डॉ : पप्पू?

शिरीष : पप्पू नाही डॉक्टर.. प.पू. म्हणजे परम पूज्य

डॉ : काय म्हणतात परमपूज्य गुरुजी?

शिरीष : ते म्हणतात, मी पण सोडा .. तेव्हा मी .. मला .. माझा त्रास .. तसा विशेष नाही डॉक्टर

डॉ : मग कसे येणे केलेस?

शिरीष : याला कारण.. आमच्या मातोश्री.. या म्हणाल्या.. मला श्रम केल्यास थकवा येतो

आई : होय डॉक्टर.. खोकत असतो हा रात्रभर

शिरीष : मी माझी तब्येत व्यवस्थित जाणून आहे आई .. आता मी बारा वर्षांचा झालोय .. या वयात ज्ञानेश्वरांनी .. शिवाजीराजांनी ..विंस्टन चर्चिल .. नेपोलियन.. आणि ॲरिस्टॉटल.. यांनी आणि आमच्या चिदानंदस्वामींनी काय काय केले..

डॉ : असेल .. पण तुला काय काय होते ते सांगशील का? आणि बाळा .. तुला बाळ म्हटले तर चालेल ना .. बाळा?

शिरीष : संबोधन हे आपल्या सोयीसाठी आहे. त्यामुळे संवाद साधता येतो. बाळ म्हणा की काळ ..

आई : शिरीष.. डॉक्टरना काय काय होते ते सांग ..

शिरीष : नाही आई .. मी मनकवडा नाही. स्वामींनी सांगितल्याप्रमाणे मी खूप प्रयत्न केले तरी मनकवडा बनण्याचा पल्ला गाठणे अवघड आहे. तेव्हा डॉक्टरना काय होते ते मी कसे सांगू?

आई : अरे, तुला काय होतेय ते सांग डॉक्टरना .. की मीच सांगू ?

शिरीष : नाही.. स्वावलंबन.. गुरूजींनी दिलेला मंत्र .. स्वावलंबन हे ..

डॉ : कोण चिदानंद गुरुजी?

शिरीष : नाही. हे घोरपडे गुरुजी.. पपू नाहीत.. साधेच

डॉ : पण तुला काय होतय सांगशील का? शिरीष : डॉक्टर मला जग जिंकायचेय .. त्यापुढे या य:कश्चित आजारांची तमा ..

डॉ : य:कश्चित आजार ? ठीक .. त्यावर उपचार.. य:कश्चित उपचार करू चल.. सांग तुला खोकला किती काळापासून आहे?

शिरीष : किती काळ? काळ अनादि आहे, अनंत आहे .. आणि खोकला म्हणाल तर दहा दिवस ..

डॉ : दम लागतो?

शिरीष : नाही .. पण मी खातो!

डॉ : काय खातोस ?

शिरीष : दम .. आम्हा निरागस बालकांचा खेळ रंगात आला असताना मी दम खातो

डॉ : वा! निरागस.. बाळा .. म्हणजे तू खेळतोस ही?

शिरीष : अर्थात.. गुरुजी म्हणाले खेळ हा प्राणवायू असतो ..

डॉ: पपू .. चिदानंद की घोरपडे..

शिरीष : नाही. हे देसाई गुरुजी.. पीटी शिकवतात. पण मला हे आवडत नाही.

डॉ : काय?

शिरीष : धावणे .. एखाद्या गोष्टीमागे धावणे .. फुटबॉल घ्या .. टेनिस घ्या .. उगाच धावणे .. येथे पपू गुरुजींचे ज्ञान देसाई गुरुजींच्या शिकवणुकीस छेद देते.. आणि उगाच कशाला धावायचे ना गरजेशिवाय?

डॉ : पण धावलास समजा .. तर दम लागेल का तुला?

शिरीष : डॉक्टर पण समजा ही कशाला? आणि धावणे ही क्रिया..

डॉ : शुक्रिया.. बाळ .. तुला दम लागतो का कळले तर पुढे सरकू ..

शिरीष : नक्कीच.. नेहमी पुढे सरकत रहा..

डॉ : असे आता कोण म्हणाले? पपू .. घोरपडे की देसाई गुरुजी?

शिरीष : नाही.. जीवन ही शाळा आहे. मी विद्यार्थी.. मी हे आमच्या शाळेच्या बसच्या कंडक्टरकडून शिकलो.

डॉ : वा! छान.. आता तरी तुला त्रास काय आहे सांगशील का?

शिरीष : जरूर.. मनात काही ठेऊ नये.. ओकून टाकावे..

आई : बाजूलाच बाथरूम आहे.. ओकारी?

शिरीष : तसे नाही गं.. मी चुरमुरे गुरूजींचे वाक्य सांगितले.. ते आमच्या पपू चिदानंद गुरूजींचे असिस्टंट आहेत.

डॉ : एकूण किती गुरूजी आहेत तुला?

शिरीष : डॉक्टरसाहेब.. जीवन ही एक शाळा आहे हे मी सांगितलेच तुम्हाला. त्यामुळे त्यातील प्रत्येक जण माझा गुरु आहे. हे टेबल आहे ना हे पण काहीतरी शिकवते. त्यामुळे त्यातील प्रत्येक जण माझा गुरू आहे. हे टेबल पण मला शिकवते.. खुर्ची ही शिकवते..

डॉ : टेबल?

शिरीष : शिकायचे म्हटले की कुठूनही शिकता येते.. टेबलाचे चारपाय समतल असायला हवेत.. म्हणजेच ते स्थिर राहते.. तद्वत..

डॉ : वा! खूप हुशार आहेस की बाळा .. त्या हुशारीचा वापर करून सांग.. तुला दम लागतो का?

शिरीष : गुरुजी.. पपू .. म्हणतात.. मनुष्यप्राण्याची भवसागरात दमछाक होणारच .. ती मनाला लावून नाही घेऊ.

डॉ : अस्सं .. मग तू माझ्याकडे का आलायेस.. सांगशील का?

शिरीष : आग्रह..

डॉ : कसला?

शिरीष : कसला नाही.. कोणाचा! मातेच्या आग्रहावरून.. जननी .. माता.. माय.. माऊली.. हिचे मन मोडू नये असे पपू गुरूजी म्हणतात.

डॉ : हे कोण .. चिदानंद गुरूजी?

शिरीष : नाही.. हे द्वितीय गुरू. पण पपूच! पपू अनेकानंद .. तर या मातेचे मन मोडू नये म्हणून येथे येण्याचा मी निर्णय घेतला. मातेचे मन..

डॉ : बाळा .. जीभ जड रे तुझी .. मलाच आता कसेसे होतेय .. स्वत:लाच आजारी पडल्यासारखे.. चक्कर येतेय.. कसेसेच होतेय.. तुझी भाषा ऐकून.

शिरीष : ठीक आहे डॉक्टर.. सांगा नीट .. काय काय होतेय? नि कधीपासून? म्हणजे खोकला.. दम.. ताप .. गुरूजींना विचारून रामबाण इलाज .. हे माझे आचार्य गुरुजी.. जडीबूटी स्पेशल.. लवकर सांगा डॉक्टर काय काय होतेय?



# पाणी.. पाणी!



बाहेर धुवांधार पाऊस आहे. मुलांचे रेनकोट आणि छत्र्या वर्गात सुकायला ठेवलेल्या आहेत. मुलं काही थोडीशीच पोहोचली आहेत. बुरकुले बाई वर्गावर येतात.

मुलं: एकसाथ नमस्ते! सुप्रभात बाई.
बाई: नमस्ते मुलांनो. सुप्रभात. पाऊस जोराचा सुरू आहे. त्यामुळे बरीचशी मुलं पोहोचलेली दिसत नाहीत..
रोहन: बाई मी गुडघ्याभर पाण्यातून आलो..

शाम: तू एवढा बुटका आहेस.. थोडंसं पाणी जमलं तरी गुडघा बुडेल तुझा..

बाई: शाम.. उगाच चिडवू नकोस त्याला. आज बाकी मुलांची वाट पाहू. तेव्हा हजेरी शेवटी घेते मी.

संजय: बाई आणि आज आहे पाणीबाणी.. अभ्यासाला घेऊ सुट्टी

रोहन: आणि पावसाची गाऊ गाणी!

बाई: छान! पाऊस असा पडतोय.. चला पाऊसपाण्यावर बोलू काही..

मुलं: म्हणजे बाई.. आज काही अभ्यास नाही!

बाई: चालेल!

या गप्पाटप्पा पाण्यावरच्या आज मारू या!
चला मुलांनो आज गाऊया
छान छान पाण्याची गाणी
इकडे तिकडे सगळीकडे
चहूकडे ते पाणीच पाणी
रोहन सोहन किंवा मोहन..
सांगा बनते कसे बरं पाणी?

मोहन:

हायड्रोजन दोन एक आॅक्सिजन
यांनी मिळूनी बनते पाणी

रोहन:

बाई, बाई, मी सांगू आणि?
बर्फ घन, वाफ वायू आणि द्रवरूप म्हणजे पाणी

सुषमा:

बर्फ वितळता होते पाणी

वाफ गोठता होते पाणी

शाम:

आणि बर्फ म्हणजे गोठलेले पाणी!

संजय:

वाफ म्हणजे तोंडाची नाही..

बाष्पीभवनातून हे उडते पाणी!

बाई: हुशार आहात मुलांनो तुम्ही. पाणी हे सर्व जगाला व्यापून राहिले आहे. पाणी म्हणजे जीवन. पाण्यावाचून सजीव सृष्टी न जगणार न तगणार!

संजय:

तहान लागली तेव्हा सर्वांना हवेच पाणी

सुषमा:

झाडाझुडपांना ही जगण्यासाठी हवेच पाणी

रोहन:

छोट्या मोठ्यांना अन सर्वांना गरजेचे पाणी!

मोहन: मी सांगू?

आकाशातून ढग गरजतो.. मग पडते जमिनीवर पाणी

सुषमा:

पाऊस पडतो जमिनीवर मग

वाहून जाते तिथले पाणी

मोहन:

सूर्यदेव तो आग ओकितो

आकाशी मग उडते पाणी

बाई:

वाफ वाफ ती आकाशातूनी
जमुनी बनवती ढग ते आणि
फुटता ढग ते पडते खाली
पाऊस रूपाने परत ते पाणी
असे चालते जलचक्र हे पाण्यातूच ते बनते पाणी!

रोहन:

पाऊस पडतो नद्या भरती
वाहून दुथडी वरती पाणी

संजय:

तळी तलाव विहीर बावड्या
भरूनी जाती येता पाणी

रोहन:

नसेल पाणी नसेल पाऊस
तर दुष्काळाची आणीबाणी

संजय:

म्हणू त्याला आपण आणि
ही तर आहे पाणीबाणी

बाई:

खरंय. दुष्काळात सगळीकडे जमीन सुकते. भेगा पडतात..

सुषमा:

माझ्या आजीच्या पायाच्या टाचांना पडल्यात तशा?

बाई: आणि तोच पाऊस खूप जास्तच पडला तर?

सुषमा:

होय ना बाई.. पाणीच पाणी होते तेव्हा म्हणती त्याला पूर

बाई:

खरंय तुझं.. जीवनदायी पाणी दाखविते तेव्हा अलगच नूर

म्हणजे बघा मुलांनो, कुठल्याही बाबतीत अति तिथे..

मुलं: माती!

बाई: तेव्हा कसलाही अतिरेक कधी करू नका.

बरं मुलांनो, तुम्हाला रसायनशास्त्रात पाण्याबद्दल काय शिकवलंय?

पाणी हे एक संयुग आहे..

सुषम:

पाण्याला ना गंध रंग रूप ते

ना आकार त्याला असले पाणी

ज्यात भांड्यात घालू तसला

आकार घेते हे तर पाणी

रोहन:

ना चव ना वास ही त्याला

ज्यात पडे तसले हो पाणी

सुषमा:

ॲहॅ रे .. बास!

गंध म्हणजेच वास.

मी आधीच बोलले ना बाई?

बाई: ठीक. भांडाभांड करू नका.. ऐका..

दूर देशी राजपुत्र तो

मस्तीखोर तो अतीच आणि

शाळेमध्ये शिक्षा मिळता
डोळयामधे ये टचकन पाणी!

सुषमा:

कुणी जोरात कुणी मुळुमुळु रडती

बाई:

म्हणजे येती गाई पाण्यावरती!

सुषमा:

आणि बाई कुणी हसवे तर
हसून हसून ही ये डोळा पाणी!

बाई: आपली भाषा आहे ना त्यात ही पाणी आहे सगळीकडे. जिकडे तिकडे पाणीच पाणी.. कोण सांगेल?

संजय:

तहान लागली विहीर खणा रे
विहीरीला मग लागे पाणी

रोहन:

गावामध्ये एक राव तो
लक्ष्मी भरते त्या घरात पाणी

मोहन:

गावोगावी फिरती लोक ते
बारागावचे पितात पाणी

संजय:

शूर वीर ते लढती तेव्हा
दाखविती तलवारीचे पाणी

सुषमा:

शत्रूला मग पाजतील ते
पराजयाचे अन मग पाणी

रोहन:

हृदयद्रावक कथा ऐकता
काळजाचे ही होई पाणी

मोहन:

कुणी म्हणती कुठे मुरते पाणी

संजय:

जीव कुणाचा हो पाणी पाणी

बाई:

मृदु ठेवा तुम्ही मुलांनो
आपली वाचा आपुली वाणी
शब्द वापरा जपुनी न आणा
कुणाकुणाच्या डोळयां पाणी

रोहन:

कुणी कुणास पाणी पाजीतसे
कुणी कशावर सोडत पाणी

सुषमा:

एका राजाच्या राण्या दोन म्हणती
तू राणी अन मी ही राणी
नाही करणार काम कसलेही
मग आणि पाणी कोण आणी?

बाई:

शाबास मुलांनो हुशार किती तुम्ही
विद्येकरिता करा रक्ताचे पाणी
पण कुणास नका पाण्यामध्ये पाहू
पाण उतारा कुणाचा नका करू

सुषमा:

परीक्षा येता न पळावे तोंडचे पाणी
मेहनत आपण नित्य करू!

बाई:

डोळे असती पाणीदार अन
कुणाचे असते वेगळेच पाणी
एक महाकवी म्हणून गेले..
हृदयी अमृत नयनी पाणी!

एक मुलगा, प्रणव आत येतो. रेनकोट घातलेला.

प्रणव: बाई मी आत येऊ?

बाई: ये. भिजलेला दिसतोस..

प्रणव: नाही बाई. थोडाच भिजलो. रेनकोट होता ना म्हणून. पण शाळेभोवती पाणी साचलेय.. मला वाटलं सुट्टी मिळेल..

शाम: तू काय गाणं आत आलास? शाळेभोवती तळं साचून सुट्टी मिळेल काय?

रोहन: भोलानाथ म्हणेल.. हा घे पाऊस!

मोहन: आई म्हणेल मग शाळेत नको जाऊस!

सोहन: पण मी तर म्हणतो.. ए आई मला पावसात जाऊ दे!

सुषमा: आणि पावसात भिजूनी तुला सर्दी छान होऊ दे!

बाई: चिडवाचिडवी नको. आता मी एक प्रश्न विचारेन.. तुम्हा सर्वांना शुद्धलेखन येतं ना नीट?

शाम: मला येतं.. पण मोहनचं ठाऊक नाही!

मोहन: शाणाच आहेस.. बाई याने त्या दिवशी मी मधला लिहिला पहिला! अशुद्धलेखनात पहिला आहेस तू..

बाई: भांडाभांड नाही.. तुमची भांडणं पाहिली की उगाच माझ्या तोंडचं पाणी पळते.. तर प्रश्न असा.. पाणी मधला णी ऱ्हस्व असेल तर त्याचा अर्थ काय?

सुषमा:

बाई मी सांगू?
चक्रपाणि.. ज्याच्या हाती चक्र तो चक्रपाणि
पाणि म्हणजे हस्त.. हात.. कर

रोहन:

हॅ हॅ.. कर नाही त्याला कशास डर?

बाई:

वेगवेगळा असतो कर..
हात.. कार्य.. राजा घेतो तो कर..
एकच शब्दास अर्थ अनेक
उगा नको अर्थावरून करकर

मुलांनो, एका शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात. हात शब्दाचे पण असेच अर्थ निघू शकतात. पण एकाच अर्थाचेही अनेक शब्द असतात..

प्रणव: मला ठाऊकै.. त्यांना समानार्थी शब्द म्हणतात..

बाई: तर पाण्याला समानार्थी शब्द कोणते?

रोहन:

जल नीर तोय म्हणजे पाणी

शाम:

उदक अंबु सलिल म्हणजे ही पाणी

सुषमा:

पय म्हणजे पाणी, वाॅटर म्हणजे ही पाणी

बाई:

एक राहिले.. जीवन म्हणजे ही पाणी!
पाणी म्हणजे आहे जीवन, जीवन म्हणजे ही पाणी..

तास संपल्याची घंटा वाजते

बाई:

आजचा तास संपला.. आज आपण काय शिकलो?

प्रणवला शिंका येतात..

शाम:

आम्ही शिकलो.. पण बाई हा प्रणव नुसताच शिंकला..

बाई: शामबाबू, एका अनुस्वारात पडतो फरक.. नाहीतर तुझं नाव होईल
शामबांबू!


सगळी मुलं शामबांबू म्हणत हसायला लागतात..

बाई: आजचा तास संपला.. मुलांनो उद्या परत भेटू..
मुलं:
सांग सांग भोलानाथ.. उद्या पण पाऊस पडेल काय
शाळेभवती तळं साचून अभ्यास बुडेल काय..




# डॉ. नितीन मोरे यांची ४७+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.
























चक्रमादित्य भाग १ ते ४

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.









डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0





HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा




डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३




डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे










डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
दादू


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे


आधुनिक कहाण्या




डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते
कानगोष्टी



डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते


डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे पन्नासावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांनी पुस्ताअंचे अर्धशतक पूर्ण केले आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ.

मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (५०), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३१), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (३), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(८) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१७), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), ), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), जयश्री पटवर्धन(७) अरविंद बुधकर (२) प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (१०), सविता शेट्टी (३) श्रीरंग कौलगी  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)